# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर - वसई-विरार यांचे
कार्यालय रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व, जि. ठाणे
दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१
E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


प्रेस नोट :- ४००/२०२३ दिनांक – १४/११/२०२३

## बनावट कागदपत्राचे आधारे लोकांची फसवणुक करुन ०३ वर्षा पासून पोलीसांना गुंगारा देणारा सराईत आरोपीला मध्यवर्ती गुन्हे प्रकटिकरण कक्ष, गुन्हे शाखेकडून शिताफीने अटक

फिर्यादी श्रीमती जया विनोद बजाला, मॅनेजर डि. सी. बी. बॅक, शाखा मिरारोड पुर्व यांचे बॅक खाते नंबर ०३९१२४०६०१२००६ चे ०३ बनावट धनादेश तयार करुन ते वेगवेगळया बॅक खात्यामध्ये डिपॉझिट करुन त्यानंतर दुसरे बॅकेत रक्कम वळती करुन तदनंतर ती काढून घेवून एकुण ११,९२,५००/- रुपयेची फसवणूक केल्याने अज्ञात इसमा विरुध्द तक्रार दिल्याने मिरारोड पो.स्टे. गुन्हा नोद क्र.४९/२०२० भा.दं.वि.सं.क. ४०२,४६७,४६८,४७१ दिनांक ११.०३.२०२० प्रमाणे नोंद आहे. नमुद गुन्हयाचे तपासातअंती निष्पन्न आरोपी नामे सुशिल अंबीकाप्रसाद दुबे याचा पोलीसांनी सर्वोतोपरी शोध घेतला तो मिळून येत नव्हता.

वरील गुन्हयातील आरोपी नामे सुशिल अंबीकाप्रसाद दुबे हा त्याचे सद्याचे वास्तव्याचे ठिकाण वारंवार बदलत होता. पोलीसांनी नमुद आरोपीचा शोध घेतला परंतु तीन वर्षाचा कालावधी होवूनही तो मिळून येत नव्हता. पोउपनिरी.हितेंद्र विचारे व पथक यांनी केलेल्या तांत्रीक विष्लेषन व गुप्त बातमीदारामार्फत मिळालेल्या माहीतीचे आधारे नमुद आरोपीस दिनांक ११.११.२०२३ रोजी तिवारी कॉलेज जवळ, मिरारोड पुर्व येथुन शिताफीने ताब्यात घेण्यात आलेले आहे.

आरोपी नामे सुशिल अंबीकाप्रसाद दुबे याचेकडे केले तपासात त्याचे विरुध्द खालील प्रमाणे बनावट कागदपत्राचे आधारे लोकांची फसवणुक केल्याचे गुन्हे दाखल असुन त्यातही तो पोलीसांना मिळुन येत नव्हता.

| | |
|---|---|
| १) | मिरारोड पो.स्टे. गुन्हा नोद क्र.४९/२०२० भा.दं.वि.सं.क. ४०२,४६७,४६८,४७१ प्रमाणे |
| २) | नालासोपारा पो.स्टे. गुनोक्र. I ५८८/२०२१ भादविसक ४२०, ४६७, ४६८, ४७१,३४ सह नोदणी अधिनियम १९०८ चे कलम ८२ प्रमाणे |
| ३) | अर्नाळा सागरी पो.स्टे. गुनोक्र. I २०४/२०२२ भादविसक ४२०, ४६५, ४६७, ४६८, ४७१, ३४ प्रमाणे |
| ४) | वालीव पो.स्टे. गुनोक्र. I ८६४/२०२२ भादविसक ४२०, ३४ प्रमाणे |

तसेच आरोपी नामे सुशिल अंबीकाप्रसाद दुबे याचे विरुध्द सन २००४ सालापासुन मुंबई शहर, ठाणे शहर, नवी मुंबई, नागपुर येथील पोलीस ठाण्यात फसवणुक केल्याचे गुन्हे दाखल असुन त्यात आरोपीस यापुर्वी अटक करण्यात आलेली आहे.

| | |
|---|---|
| १) | खार पो.स्टे. मुंबई शहर गुनोक्र. I १७६/२००४ भादविसक ४२०, ४६५, ४६७, ४६८, ४७१, ३४ प्रमाणे |
| २) | नौपाडा पो.स्टे. ठाणे शहर गुनोक्र. I ५२८/२०१६ भादविसक ४२०, ४६७, ४६८, ४७१, ४०६,१२०(ब) प्रमाणे |
| ३) | ठाणे नगर पो.स्टे. ठाणे शहर गुनोक्र. I ३९/२०१७ भादविसक ४२०, ४६५, ४६७, ४६८, ४७१, ३४ प्रमाणे |
| ४) | एपीएमसी पो.स्टे. नवी मुंबई गुनोक्र. ४२/२००९ भादविसक ४२०, ४६५, ४६७, ४६८, ४७१, ३४ प्रमाणे |
| ५) | गिटीखदान पो.स्टे. नागपुर गुनोक्र. ६५४/२०२३ भादविसक ४२०, ४०६, ३४ प्रमाणे |

नमुद आरोपी नामे सुशिल अंबीकाप्रसाद दुबे वय-४५ वर्षे रा. ३०७, ए विंग, चितोड गड बिल्डींग, खारेगांव, नवघर, भाईदर पुर्व यास पुढील कारवाईकामी मिरारोड पोलीस ठाणे याचे ताब्यात देण्यात आले आहे.

सदरची कारवाई श्री.अविनाश अंबुरे पोलीस उप-आयुक्त (गुन्हे), श्री.मिलींद बल्लाळ सहा. पोलीस आयुक्त

(गुन्हे) यांचे मार्गदर्शनाखाली मध्यवर्ती गुन्हे प्रकटीकरण शाखेचे प्रभारी पोलीस निरीक्षक राहुल राख, पोउपनिरी. हितेंद्र विचारे, सफौ. श्रीमंत जेधे, पोहवा.संग्राम गायकवाड, पोहवा. राजाराम काळे, पोहवा.प्रविणराज पवार, पोहवा. आसिफ मुल्ला यांनी केलेली आहे.

